**अर्जदाराचा उलटतपास : सामनेवाला तर्फे श्री. व्ही. एस. खनके यांच्यामार्फत शपथेवर सुरू :**

1. मी अकौंन्टस मॅनेजर म्हणून सामनेवाला कंपनीमध्ये काम करीत आहे, माझे बीकॉम व एमबीऐ फायनान्स शिक्षण झालेले आहे. मी सन मार्च 2018 पासुन कंपनीत काम करीत आहे. कंपनीच्या दोन शाखा आहे व दोन्ही कंपन्यांचे मिळून एक ऑफिस आहे. कंपनीची एक शाखा वाळुज एमआयडीसी व दुसरी पाटोदा या गावामध्ये आहे. कंपनीचे ऑफिस बीड बायपास रोडवरती आहे. मी कंपनीचे बीड बायपास ऑफिसमध्ये अकौंन्टंट म्हणून काम करीतो. हे मला माहित नाही की, कंपनीचे बीड बायपासचे ऑफिस केव्हा सुरू झाले. हे म्हणणे खरे आहे की, वाळुज एमआयडीसी मधील कंपनी व बीड बायपास ऑफिस एकाचवेळेस चालू झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुरुवातीचे ऑफिसचे कामकाज कंपनीचे वाळूज एमआयडीसी येथून चालत होते. श्रीवर्धन यादव हे कंपनीमध्ये डिसपॅचे क्लार्क म्हणून काम करीत होते ते सन 2020 किंवा सन 2021 या कालावधीपासुन काम करीता होते. श्रीवर्धन यादव हे सन 2023 पर्यंत कंपनीच्या कार्यालयात काम करीत होते.

2. श्रीवर्धन यादव हे कोणत्या पदावर व कधीपासून काम करीत होते याचे कागदपत्रे मी दाखल करू शकतो. मला कंपनीने अधिकारपत्र दिलेले असेल परंतु ते दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कंपनी तर्फे साक्ष देण्याचा कोणताही अधिकार नाही.

वकीलांच्या विनंतीवरून उलटतपास तहकुब..

उलटतपास : अपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

LABOUR COURT MAHARASHTRA

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.02.23 13:31:11 +0530

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–20/02/2026